REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १२ जानेवारी, १९४४ अंक २

दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.
( स्थापना : १९१९ )
आम्हीं आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.
—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—
सर होमी मेहता, के. बी. ई., जे. पी.
पुणें शाखा :
मोति माणिक मॅन्शन,
लक्ष्मी रोड.
हेड ऑफिस :
मेहता हाऊस,
अपोलो स्ट्रीट, मुंबई.

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

चटण्या तयार मिळतात !
लसुणाची, जवसाची, कारळेची वगैरेची नवरत्न चटणी, मँगो चटणी इ०
द. ना. हेजीब.
(३) १० शुक्रवार, पुणें.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### मोटारींच्या उत्पादनास प्रारंभ !

बिर्ला बंधू लवकरच मोटारींच्या उत्पादनास प्रारंभ करूं शकतील, अशी कल्पना आहे. त्यासंबंधींतील पूर्वतयारी ते करीत आहेत.

### विहिरी व तळीं ह्यांसाठी २७ लक्ष रुपये

धारवाड, बेळगांव व कानडा जिल्ह्यांतील १,२०० विहिरी व ६०० तळीं दुरुस्त करून व तेथें आणखी ८०० विहिरी व ५०० तळीं खणून तांदुळाच्या लागवडीस पाटाचें पाणी उपलब्ध करण्याच्या योजनेसाठी २७ लक्ष रुपयांची एक योजना शेतकी खात्यानें मुंबई सरकारला सादर केली आहे. एकूण खर्चाच्या एक तृतीयांश खर्च सरकारनें सोसावा, अशी कल्पना आहे. ही योजना पुरी झाली तर २ लक्ष, ४० हजार मण अधिक धान्य पिकूं शकेल. विजापूर व सोलापूर जिल्ह्यांच्या दुष्काळी विभागांचाहि समावेश वरील योजनेंत आहे.

### साखरेचें घरगुती उत्पादन

साखरेचें घरगुती उत्पादन करणाऱ्या सोप्या यंत्रसामुग्रीची बिलारी येथील शुगर रिसर्च अँड टेस्टिंग स्टेशननें रचना केली आहे, तिचे सहायानें शेतकऱ्यांस स्वतःच शेतावर, घरच्या लोकांच्या मदतीनें व बैलाच्या शक्तीवर दररोज २५ ते ३० मण ऊस गाळतां येईल. ह्या यंत्रावर काढलेल्या साखरेवर एक्साइझ ड्यूटी पडणार नाहीं, कारण ती काढतांना वीज, तेल, कोळसा वाफ, इत्यादि कोणतीहि प्रेरक शक्ति वापरलेली नसते.

### ब्रिटिश कोळशाच्या खाणींत इटालियन युद्धकैदी !

जर्मनी इटलीला दरसाल १½ कोटि टन कोळसा पुरवीत होता. आतां हा कोळसा पुरविण्याचें काम ग्रेट ब्रिटनकडे येईल. ह्या दृष्टीनें, ग्रेट-ब्रिटनमधील इटालियन युद्धकैद्यांना कोळशाच्या खाणींत कामास लावावयास हरकत नाहीं, असें तेथें सुचविण्यांत येत आहे. इटलीनें आतां संयुक्त राष्ट्रांस मदत करण्याचें ठरविलें आहे, व तेथील कारखान्यांस कोळसा लागेल तो पुरविण्याचा हा मार्ग आहे.

### इंडियन आयर्न अँड स्टील कं. लि.

वरील कंपनीस ३१ मार्च, १९४३ अखेर संपलेल्या वर्षी ५० लक्ष रुपये नफा झाला.

### बँक ऑफ इंडियाच्या भांडवलांत वाढ

बँक ऑफ इंडियाचें सध्याचें अधिकृत भांडवल २ कोटि रुपये व वसूल भांडवल १ कोटि रुपये आहे, तें अनुक्रमें ३ कोटि व १½ कोटि रुपये करण्यांत यावयाचें आहे. प्रत्येक दोन भागांस एक नवा भाग ह्या प्रमाणांत सध्याच्या भागीदारांस नवे भाग मिळतील, व ह्या नव्या भागासाठी ५० रुपये वाढावा द्यावा लागेल. म्हणजे १५० रुपये दिले, की १०० रुपयांचा ५० रुपये वसूल भांडवलाचा एक भाग त्यांस मिळेल व ५० रुपये प्रीमियम म्हणून बँकेकडे जमा होतील. भांडवलाच्या ह्या वाढीस बँकेनें हिंदुस्थान सरकारची संमति मिळविली आहे. ह्या संबंधींतील ठराव भागीदारांच्या सभेस यथाकाल सादर करण्यांत येईल. बँकेच्या भागाची आजच्या बाजारभावानें किंमत २२७ रु. ८ आ. आहे. १५० रुपयांस जुन्या भागीदारांना नवा भाग मिळणार आहे.

### हिंदी कारखान्यांतील अपघात

( ताजे उपलब्ध आकडे )

| | १९४० | १९४१ |
|---|---|---|
| अपघातांची संख्या | ४१,०१५ | ३८,९०८ |
| नुकसान भरपाईची रक्कम ( लक्ष रु. ) | १५·८३ | १९·३८ |
| नुकसान भरपाईची सरासरी रक्कम ( रु. ) | ४७·२ | ४०·७ |

अपघातांची संख्या व नुकसान भरपाईची रक्कम ह्या दोन्ही बाबतींत मुंबई प्रांत सहाजीकच अग्रेसर आहे. कमी मजुरी मिळणाऱ्या कामगारांत अपघातांचें प्रमाण जबर असतें, असें आढळलें. मुंबईमधील बहुतेक गिरणीवाले नुकसान भरपाईचा विमा उतरतात. कामगारांना नुकसान भरपाई मिळवून देण्याचे कामीं मजूर संघांनीं जास्त दक्षता बाळगणें जरूर दिसतें. कांहीं मालक मजुरांच्या दारिद्र्याचा फायदा घेऊन, नुकसान भरपाईची रक्कम देण्याचें टाळतात अथवा तडजोड करून कमी रक्कम देतात, ह्या अश्लाघ्य गोष्टीकडे रिपोर्टानें लक्ष वेधलें आहे.

### नॅशनल सेव्हिंग्ज बँक लि., मुंबई

वरील बँकेचे ५% क्यु. प्रेफरन्स, ऑर्डिनरी व डिफर्ड असे तीन प्रकारचे भाग होते, ते तिनें रिझर्व्ह बँकेच्या बँकांच्या भागांच्या रचनेसंबंधीं सूचनेप्रमाणें एकत्रित करून आतां फक्त ऑर्डिनरी भागच केले आहेत.

### असोसिएटेड सिमेंट कंपनीज लि.

वरील कंपनीला ३१ जुलै, १९४३ अखेर संपलेल्या वर्षी ५९½ लक्ष रुपये नफा झाला. भागीदारांस प्रत्येक भागावर ( १०० रु. ) ७ रुपये करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे.

### उष्णतामान १०° कमी, १२ हजार टन कोळशाची बचत

न्यूयॉर्कमधील पृष्ठभागाखालील रेल्वेजच्या डब्यांतील उष्णतामान १० डिग्रींनी कमी करून दरमहा १२ हजार टन कोळशाची बचत करण्याची योजना न्यूयॉर्क बोर्ड ऑफ ट्रान्स्पोर्टेशनपुढें आहे.

### सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेस १९४३ मध्यें १ कोटि, ७ लक्ष रुपये निव्वळ नफा झाला. भागीदारांस १०% डिव्हिडंड व २% बोनस मिळणार आहे. बँकेचें वसूल भांडवल १ कोटि, ६८ लक्ष रुपये आहे व तिचेकडे ७२½ कोटींच्या ठेवी आहेत.

### आंतरराष्ट्रिय चलन परिषद

वॉशिंग्टन ( अमेरिका ) येथें युद्धोत्तर आंतरराष्ट्रीय चलनविषयक प्रश्नांचा विचार करण्यासाठी बोलाविलेली परिषद लवकरच सुरू होईल, असें दिसतें. रशियन आर्थिक तज्ज्ञ वॉशिंग्टनला पोंचले आहेत.

### ५० कोटि रुपयांचें नवीन कर्ज

हिंदुस्थान सरकार ३% व्याजाचें १९६६–६८ मध्यें परतफेडीचें, ५० कोटि रुपयांचें कर्ज काढणार आहे.

### अमेरिकेची प्रचंड निर्गत

अमेरिकेनें १९४३ च्या पहिल्या ११ महिन्यांत १९½ अब्ज डॉलर किंमतीच्या मालाची निर्गत केली. १९४२ च्या मानानें हा आकडा ५९% नें जास्त आहे. अमेरिकन सैनिकांसाठी परदेशीं पाठविलेल्या साहित्याचा समावेश त्यांत झालेला नाहीं.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | १० |
| २ हिंदुस्थानांत ब्रिटिश धंदेवाल्यांचें भावी स्थान ... | ११ |
| ३ ग्रेटब्रिटन व अमेरिका ह्यांच्या युद्धसहाय्याची तुलना | १२ |
| ४ रोटींत व चपातींत मिश्रण | १२ |
| ५ पोंच ... | १२ |
| ६ स्फुट विचार ... | १३ |
| हिंदी दुष्काळावर उपाय—शास्त्रीय व औद्योगिक शिक्षणाची व्यवस्था—भौतिक शास्त्रांचें संशोधन | |
| ७ शिक्षणप्रसाराची विशाल योजना ... | १४ |
| ८ पुण्यानाजिकचें नमुनेदार खेडें ... | १४ |
| ९ शेअर बाजार ... | १५ |



# अर्थ

बुधवार, ता. १२ जानेवारी, १९४४


## हिंदुस्थानांत ब्रिटिश धंदेवाल्यांचें भावी स्थान

राजकीय सत्ता नवीन राज्यघटनेच्या मनूमध्यें पूर्णपणें हिंदी लोकांच्या हातीं जाईल तेव्हां ह्या देशांत स्थापन झालेल्या ब्रिटिश कारखानदारांचें व धंदेवाल्यांचें स्थान अबाधित राहून त्यांस अन्यायानें किंवा विषमतेच्या भावनेनें वागवलें जाऊं नये ह्यासाठीं पुरेसे कायदेशीर निर्बंध घातले जावे अशी मागणी करण्यांत येत असे. हिंदी राज्यघटनेमध्यें बदल करण्याबाबत होणाऱ्या चर्चेंत हा विषय नेहमी येत असतो. युरोपिअन व्यापारी मंडळांच्या गेल्या महिन्यांत कलकत्ता येथें भरलेल्या सभेंत ह्या प्रश्नाचा उल्लेख केला गेला आणि स्वतंत्र हिंदुस्थानांतहि त्याच्या आर्थिक प्रगतीच्या दृष्टीनें ब्रिटिश धंदेवाल्यांचें सहकार्य उपयुक्त व अपरिहार्य ठरेल अशा अर्थाचे उद्गार काढण्यांत आले. मोठ्या प्रमाणावरील कारखाने व धंदे चालविण्याचें ज्ञान व अनुभव हिंदी लोकांस नव्हता तेव्हां ब्रिटिश धंदेवाल्यांचें उदाहरण स्वदेशी उद्योगांस स्फूर्तिदायक व सहायकारक झालें आहे ह्यांत शंका नाहीं. तथापि, काळाच्या व प्रगतीच्या ओघाबरोबर ह्या देशांतील मोठाले धंदे हिंदी लोकांच्या हातीं यावे आणि त्यांपासून होणारा सर्व प्रकारचा फायदा एतद्देशीयांस मिळावा अशी महत्वाकांक्षा त्यांनीं बाळगणें अगदी स्वाभाविक आहे आणि ह्या कामीं राष्ट्रीय सरकारनें उत्तेजन व सहाय द्यावें अशी अपेक्षा त्यांनीं करणें अयोग्य नाहीं.

युद्ध संपतांच शक्यतितक्या लवकर हिंदुस्थानास स्वतःची राज्यघटना बनवण्याचें पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत येईल असें आश्वासन ब्रिटिश सरकारनें दिलें आहे. अशा ह्या प्रकारानें प्रस्थापित होईल त्या हिंदी स्वराज्यांत ब्रिटिश धंदेवाल्यांची परिस्थिति काय होईल ह्यासंबंधाचा प्रश्न त्यांच्या तर्फेनें उपस्थित करण्यांत येत आहे ह्यांत नवल नाहीं. कलकत्त्याच्या स्टेटसमन पत्राचे माजी संपादक, सर आलफ्रेड वॉटसन, ह्यांनीं एका ब्रिटिश नियतकालिकांत प्रस्तुत विषयावर लेख लिहिला आहे त्याच्या प्रसिद्ध झालेल्या गोषवाऱ्यावरून हिंदुस्थानांतील ब्रिटिश धंद्यांच्या भवितव्याबाबत त्यांच्या हितसंबंध्यांचें मत काय आहे ह्याची कल्पना येते. युद्धोत्तर काळांत कारखानदारीच्या उत्कर्षास एवढा वाव मिळेल कीं हिंदी भांडवलवाल्यांची सांपत्तिक शक्ति ह्या प्रगतीस पुरी पडणार नाहीं आणि ब्रिटिश धंद्यांत हात घालण्याचें त्यांस साधणार नाहीं असें सर आल्फ्रेड म्हणतात. ब्रिटिश व्यवस्थेखालील धंद्यांविषयीं हिंदी जनतेस विशेष विश्वास वाटतो आणि त्यांमधील कामकाज्यांत अधिक समाधान असतें; ह्यासाठीं ह्या धंद्यांचा किता स्वदेशी कारखानदारांच्या पुढें असणें इष्ट आहे असेंहि मत त्यांनीं व्यक्त केलें आहे. ब्रिटिश व हिंदी कारखानदारांची ह्या रीतीनें तुलना करून सर आल्फ्रेड ह्यांनीं स्वदेश बांधवांच्या उच्च कार्यक्षमतेची व विश्वासार्हतेची स्तुती केली आहे, तिच्याकडे हिंदी धंदेवाल्यांचें लक्ष जाणें अगत्याचें आहे. हिंदी धंद्यांची अलीकडे इतकी सर्वांगीण प्रगति झाली आहे कीं ते आणि ब्रिटिश मालकीचे धंदे ह्यांमध्यें वरील प्रकारचें अंतर आहे कीं काय ह्या प्रश्नास योग्य उत्तर मिळणें आवश्यक आहे. सर आल्फ्रेड ह्यांच्या विचारसरणींत कांहीं तथ्य असलें तरी हिंदी स्वदेशी धंद्यांस राष्ट्रीय सरकाराकडून उत्तेजन मिळण्याचें अगत्य त्यांस नाकारतां येणार नाहीं आणि त्यांच्या नकारास किंमतहि दिली जाणार नाहीं.

हिंदी कारखानदारी मागें प्राथमिक अवस्थेंत होती त्यावेळीं ब्रिटिश धंदे ह्या देशांत अग्रस्थानीं होते ही स्वाभाविक गोष्ट होय. परंतु गेल्या पंचवीस वर्षांत हिंदी मालकीच्या मोठ्या प्रमाणावरील धंद्यांनीं चांगली प्रगति करून युरोपिअन व्यवस्थेखालीं असलेल्या कारखान्यांशीं बरोबरीचें स्थान मिळविलें आहे. लोखंड, पोलाद, सिमेंट, कापड, साखर, कागद इत्यादिसंबंधांतील देशी धंद्यांत ब्रिटिश कारखान्यांच्या मानानें कमी कार्यक्षमता आहे आणि त्यांचेवर हिंदी जनतेचा विश्वास नाहीं असें म्हणतां यावयाचें नाहीं. सरकारी संरक्षण व उत्तेजन मागण्याचा कोणास हक्क असेल तर तो स्वदेशी उद्योगधंद्यांस आहे. संरक्षणाचें धोरण स्वीकारलें गेल्यापासून हिंदी कारखाने भरभराटीस आले आहेत हें स्पष्ट आहे आणि हिंदी जनतेच्या स्वार्थत्यागानें उदयास येणारे धंदे हिंदी भांडवलावर चालणारे व हिंदी व्यवस्थापकांच्या नियंत्रणाखालीं असले पाहिजेत ह्या तत्त्वास विरोध होण्याचे दिवस आतां राहिलेले नाहींत. मोठीं जहाजें, समुद्रावरील वहातूक, मोटारी, विमानें, रासायनिक द्रव्यें, ह्यांचे संबंधांतील हिंदी धंद्यांस सरकारचें साहाय्य मिळालें पाहिजे ही लोकांची मागणी आहे आणि राष्ट्रीय सरकारास ती डावलतां येणार नाहीं. युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेंत सर्व प्रकारचे महत्त्वाचे स्वदेशी धंदे स्थापन होण्याची तजवीज करावयाची नाहीं तर तिचा उपयोग काय? देशांत भांडवल, उत्साह व अनुभव ह्यांची आतां वाण नाहीं आणि युद्धप्रयत्नासाठीं शिकवून तयार केलेले कुशल कारागीर ह्यांस कारखान्यांत काम पुरवावें लागणारच आहे. ब्रिटिश कारखानदारांस व धंदेवाल्यांस विषमतेनें मुद्दाम वागवलें जावें असें कोणीहि सुज्ञ मनुष्य म्हणणार नाहीं. पण आपल्या हितसंबंधांचें खास रीतीनें संरक्षण केलें जावें असा त्यांचा आग्रह असेल तर तो फोल आहे. विशिष्ट अनुकूल परिस्थितीचा फायदा आजवर त्यांस मिळाला आहे तो ह्यापुढें तसाच मिळत रहावा असें त्यांस वाटत असलें तर तेंहि चुकीचें आहे. स्वदेशी मालकीच्या धंद्यांस सवलती मिळूं नयेत आणि आंतरराष्ट्रीय व्यापार खुला रहावा ह्या पुराण तत्त्वाचें घोडें युद्धोत्तर जागतिक पुनर्घटनेच्या सहकारी तत्वावर त्यांस दामटतां येणार नाहीं. सर्व राष्ट्रांची शक्य तितकी आर्थिक प्रगति घडवून आणण्याचें धोरण ह्या पुनर्घटनेंत अंतर्भूत नसेल तर ती यशस्वी होणार नाहीं.

### ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्यांच्या युद्धसहायाची तुलना

अमेरिका ग्रेट ब्रिटनला व इतर संयुक्त राष्ट्रांना कर्ज-उसनवार पद्धतीनें फार मोठ्या प्रमाणावर मदत करीत आहे, त्या मानानें ग्रेट ब्रिटनची परत मदत फारच अल्प प्रमाणांत होत आहे, अशी कल्पना पसरलेली होती ती दूर करून ग्रेट ब्रिटनच्या सहायाचें स्वरूप स्पष्ट करणारें एक पत्रक ब्रिटिश सरकारनें प्रसिद्ध केलें आहे. युद्धाच्या प्रारंभाचे काळीं ग्रेट ब्रिटननें अमेरिकेंत रोखीनें खरेदी केली, त्यामुळें ग्रेटब्रिटनची अमेरिकेंतील जिंदगी संपुष्टांत येऊन मार्च, १९४१ मध्यें लेंड-उसनवार पद्धतीनें अमेरिका ग्रेट-ब्रिटनला सहाय देऊं लागली. तेव्हांपासून दोन वर्षाचे अवधींत अमेरिकेनें संयुक्त राष्ट्रांस १० अब्ज, ३२ कोटि डॉलर्स किंमतीची मदत केली. त्यापैकीं ३ अब्ज, १२ कोटि डॉलर्सची मदत ग्रेट ब्रिटनकडे गेली. कॅनडानें १९४२ सालीं १ अब्ज डॉलर्सची व १९४३ मध्यें पुनः १ अब्ज डॉलर्सची ग्रेट ब्रिटनला देणगी देऊन ग्रेटब्रिटनला उपकृत केलें. ह्या उलट, ग्रेट ब्रिटननें ३० जून, १९४३ अखेर संपलेल्या वर्षीं अमेरिकेसाठी खुद्द ग्रेट ब्रिटनमध्यें ५८ कोटि पौंड, रशियासाठी २० कोटि पौंड व इतर मित्र राष्ट्रांसाठी १९ कोटि पौंड खर्च केले. दिलेली व घेतलेली मदत ह्यांची तुलना करतांना अमेरिकेंतील उत्पादनाचा खर्च ५०% जास्त आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे, असें ब्रिटिश सरकारी पत्रकांत म्हटलें आहे. त्याचा अर्थ १ पौंड = ६ डॉलर, असा हिशेब होतो. ग्रेट ब्रिटनच्या तिप्पट लोकसंख्या अमेरिकेची आहे. लोकसंख्या व संपत्ति ह्यांचा विचार करतां, ब्रिटिश सहायाचें दर माणशी प्रमाण अमेरिकन सहाय्याच्या दर माणशीं प्रमाणाच्यापेक्षा अधिक आहे, असा सरकारी पत्रकाचा निष्कर्ष आहे. संयुक्त राष्ट्रांच्या युद्धसहायाचा खरा सावकार अमेरिका आहे, अशी असलेली प्रसृत कल्पना चुकीची आहे; ग्रेट ब्रिटनचा स्वार्थत्यागहि अमेरिकेच्या मानानेंहि अत्यंत मोठा आहे, असें ब्रिटिश सरकारचें म्हणणें आहे.

---

### गव्हाच्या रोटींत व चपातींत इतर धान्यांचें मिश्रण

मुंबई शहरांत गव्हाबरोबर बार्लीहि लोकांना घ्यावी लागत आहे आणि हें धान्य सकस असल्याचें सांगण्यांत येत आहे. लायलपूर येथील बेकिंग व मिलिंग लॅबोरेटरीमध्यें गहू व इतर धान्यें ह्यांच्या मिश्रणासंबंधीं प्रयोग करण्यांत आले, त्यांत असें आढळून आलें कीं गव्हांत १५% बार्ली, १०% बाजरी, १०% ज्वारी, १०% मका ह्या प्रमाणांत कोणतेंहि धान्य मिसळलें तरी आकार, रंग, इत्यादि बाबतींत रोटींत कोणताहि कमीपणा येत नाहीं. ह्याहिपेक्षा अधिक प्रमाणांत हीं धान्यें गव्हांत घातलीं, तरी रोटी चांगली होऊं शकते. तांदूळ मात्र त्यांत मिसळतां येत नाहीं. गव्हांत वरीलपैकीं एकादेंच धान्य न घालतां सर्व धान्यें थोडथोड्या प्रमाणांत घातलीं, तरी गव्हाच्या चपात्या चांगल्या होतात, असे लायलपूरचे प्रयोग सांगतात. शास्त्रीय दृष्ट्या हें मिश्रण चांगलें ठरल्यावर गव्हांत इतर धान्यें मिसळण्याची सक्ती करण्यास हरकत कोठून उरणार ?

---

### दुष्काळ निवारणासाठी १० कोटि रुपये खर्च

चालू वर्षांत बंगाल सरकारचा दुष्काळ निवारणाप्रीत्यर्थ होत असलेला खर्च १० कोटि रुपयांवर जाईल, असें दिसतें.

## पोच

**पुणें अ. वि. गृहाची महाराष्ट्र-रोजनिशी व कॅलेंडर:—** दरवर्षीप्रमाणें अ. वि. गृहाकडून वरील भेट आली आहे. रोजनिशींतील व कॅलेंडरांतील सर्व वैशिष्ट्यें कायम आहेत. अ. वि. गृहाच्या कार्याची आठवण सतत नजरेसमोर रहाण्यास त्यांचा उपयोग होईल.

**सानप प्रिंटिंग प्रेसचें कॅलेंडर—** ह्या कॅलेंडरांत ठळक रीतीनें इंग्रजी तारीखवार दिले आहेत व कामाच्या आठवणीसाठीं प्रत्येक तारखेस एक ओळ ठेवली आहे.

**"उद्यम" अन्न विशेषांक—** उद्यमाचा २६ व्या वर्षाचा १ला अंक अन्न विशेषांक म्हणून काढण्यांत आला आहे. दुष्काळ, अन्नपुरवठा, इत्यादि प्रश्नांबाबत जनतेला मार्गदर्शन करण्याचा त्याचा उद्देश आहे व ह्या विषयावर माहितीपूर्ण लेख त्यांत आले आहेत.

**"हेटकरी"—** हेटकरी भंडारी मंडळाच्या ह्या अधिकृत मासिकाचा ५ व्या वर्षाचा १ला अंक प्रसिद्ध झाला आहे. हें मासिक हेटकरी भंडारी ज्ञातीच्या उत्कर्षास वाहिलेलें आहे व त्यांचें संपादन, मांडणी, त्यांतील लेख, इत्यादि बाबी नमुनेदार आहेत.

**दैनिक "तरुण भारत"—** संपादक ग. त्र्यं. माडखोलकर. १९३१ सालीं कायदेभंगाच्या चळवळींत बंद पडलेलें हें वृत्तपत्र नरकेसरि कै. बॅ. अभ्यंकर स्मारक मंडळानें पुनः सुरू केलें आहे. कै. अभ्यंकरांच्या व्यापक लोकहित-साधनाचे दृष्टीनेंच तें चालविण्यांत येणार आहे, त्यांत आम्हीं त्यास यश चिंतितों.

---

### गहू व बार्ली ह्यांचें मिश्रण

मुंबई शहर व उपनगरें ह्यांतील रेशनकार्डवाल्यांना ९ तारखेपासून १:३ ह्या प्रमाणांत बार्ली व गहू मिळूं लागले. नुसते गहूं मिळत नाहींत. हीं दोन्हीं धान्यें वेगवेगळीं दिलीं जातात परंतु कांहीं गव्हाच्या ऐवजी बार्ली खावी लागते. नुसता गहू घेतला नाहीं, तर सबंद आठवड्याच्या रेशनची बार्ली मिळूं शकते. बार्ली गव्हापेक्षा २५% हलकी असल्यामुळें, सबंद रेशनची बार्लीच घेणारास २५% अधिक धान्य मिळतें. १६ जानेवारीपासून पावाच्या गव्हामध्येंसुद्धा बार्ली मिसळली जाईल. आटासुद्धा बार्लीयुक्त असेल. बार्ली हें एक सकस धान्य असून उत्तर हिंदुस्थानांत त्याचा पुष्कळ प्रसार झालेला आहे व तें गव्हांत मिसळून त्याच्या केलेल्या चपात्या, पुऱ्या इत्यादि गव्हाच्या जिनसांप्रमाणेंच लागतात, असें म्हणतात.

---

### जाकिटांचे खिसे वाढविण्याचा प्रयत्न

ग्रेटब्रिटनमध्यें, कापडाची व मजुरीची बचत करण्याचा एक मार्ग ह्या दृष्टीनें जाकिटांना दोनपेक्षा जास्त खिसे ठेवण्यास प्रतिबंध आहे. खिशांची संख्या चारपर्यंत वाढविण्यास परवानगी असावी, अशी नॅशनल फेडरेशन ऑफ मर्चंट टेलर्सनें सरकारास विनंति केली, परंतु ती अमान्य करण्यांत आली.

---

### चीनच्या कंपनी-कायद्यांत दुरुस्ती

चीनला आपले उद्योगधंदे वाढविण्यासाठी विदेशी भांडवल व तज्ञ लोक ह्यांचें सहाय लागेल, तें सहजीं मिळावें ह्याकरितां चिनी कंपनी कायद्यांत दुरुस्ती करण्याचें चिनी सरकारनें ठरविलें आहे.

# स्फुट विचार

### हिंदी दुष्काळावर उपाय

हिंदुस्थानांतील सध्याच्या दुष्काळाची कारणमीमांसा आतांपर्यंत अनेकांनीं केली व त्यावर उपायहि सुचविले. परंतु, हे सर्व उपाय आवश्यक व तातडीचे असले तरी दीर्घगामी स्वरूपाचे नाहींत. हिंदुस्थानांत पडलेल्या धान्याच्या दुष्काळामुळें ह्या प्रश्नाचें महत्त्व ठळकपणें दिसून येऊं लागलें आहे. रेशनिंग. धान्याची सरकारमार्फत जमवाजमव, कांहीं विशिष्ट मालास प्राधान्य, किंमतींचें नियंत्रण, इत्यादि उपाय ज्या देशांत लोकांना पुरें भरपूर खावयास मिळत होतें व जेथें अशा योजना नीट पार पाडण्याची उत्कृष्ट व्यवस्था आहे, अशा ठिकाणीं धान्याचा पुरवठा प्रमाणशीर चालू ठेवण्यास उपयुक्त आहेत. परंतु, हिंदुस्थानासारख्या ठिकाणीं ह्या योजनांचाच केवळ अवलंब करून पुरवठ्याचा प्रश्न समाधानकारक सुटणार नाहीं. चांगलीं पिकें आलीं तरी हिंदुस्थानांतील लोकांना अर्धपोटी रहावें लागतें व रोगराईस लक्षावधि लोक बळी पडतात. हिंदी लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणांत शेतीचें उत्पादन वाढत चाललेलें नाहीं, हें सत्य आहे. दुर्भिक्ष्य व दारिद्र्य हीं लोकसंख्येच्या वाढीस कारणीभूत होतात व वाढती लोकसंख्या दारिद्र्यांत भर घालते; इतर देशांत ज्या उच्च रहाणीच्या योगानें लोकसंख्येची वाढ नियमित झाली आहे, ती रहाणी हिंदी लोकांच्या वाट्यास येणार कशी व लोकसंख्या आणि अन्नपुरवठा यांचें समीकरण बसणार कसें? असा प्रश्न "एकॉनॉमिस्ट"नें केला आहे, तो खरोखर सबंद प्रश्नाचा पाया आहे. ज्या मानानें रोग मोठा, त्या मानानें औषधहि जहाल पाहिजे. त्याचप्रमाण, हिंदी दुर्भिक्ष्यावरील तोडगाहि प्रभावी व सर्वव्यापी पाहिजे. "सहकारी तत्त्वावर व सरकारी भांडवलाच्या सहायानें शेतीचें उत्पादन रशियाप्रमाणें मोठ्या प्रमाणावर वाढविणारी आर्थिक क्रांतीच हिंदुस्थानांत घडून आली पाहिजे." असें "एकॉनॉमिस्ट"चें म्हणणें आहे. सध्याच्या दुष्काळासंबंधीं लिहितांना, त्या पत्राचें म्हणणें आहे कीं, ग्रेटब्रिटन व अमेरिका येथें दारूगोळ्याइतकेंच लोकांच्या जीवनोपयोगी जिनसांस प्राधान्य दिलें जातें. हिंदुस्थानांत मर्यादित अन्नपुरवठ्यामुळें लोकांच्या पोटावरील पट्टा इतका आवळला गेला आहे कीं तो आणखी ओढला जाऊन बकल बसण्यास त्यांत आतां भोकच उरलेलें नाहीं!

---

### शास्त्रीय व औद्योगिक शिक्षणाची व्यवस्था

ब्रिटिश पार्लमेंटाच्या दोन्ही गृहांच्या सभासदांपैकीं ११६ सभासद व ३८ शास्त्रीय आणि व्यावसायिक शिक्षणाच्या संस्थांचे प्रतिनिधी यांची एक "पार्लमेंटरी अँड सायंटिफिक कमिटी" आहे. तिच्या उपसमितीनें युद्धोत्तर ग्रेट ब्रिटनमधील शास्त्रीय संशोधन व विश्वविद्यालयें यांसंबंधीं एक रिपोर्ट तयार केला, तो कमिटीनें मान्य केला आहे. युद्धोत्तर जगांत ग्रेट ब्रिटनला आपलें पूर्वीचें स्थान टिकविण्याचें असेल तर शास्त्रीय संशोधन १९१९–३९ च्या मानानें फारच मोठ्या व पद्धतशीर रीतीनें चालू ठेवलें पाहिजे. अशी त्या उपसमितीची सूचना आहे. संशोधक शास्त्रज्ञांची संख्या वाढावयाची म्हणजे विश्वविद्यालयें, कॉलिजें व शाळा यांतील शास्त्रीय शिक्षण सुधारलें पाहिजे हें ओघानेंच आलें. सध्या युद्धकार्यांत गुंतलेल्या परंतु पुढें रिकाम्या होणाऱ्या शास्त्रज्ञांचा शिक्षणक्रम पुरा होण्यास सवड मिळून त्यांच्या अनुभवास साजेल अशा जागा त्यांना मिळवून दिल्या पाहिजेत. विश्वविद्यालयांनीं आपल्या शास्त्रीय शाखांकडील विद्यार्थ्यांची संख्या तात्काळ वाढविली पाहिजे व त्यासाठी विश्वविद्यालयांचा विस्तार करावा लागेल व कांहीं संस्थांचें नव्या विश्वविद्यालयांतहि रूपांतर करावें लागेल, असें रिपोर्ट म्हणतो. इमारती व सामुग्री यांचेवर पहिल्या पांच वर्षांत मिळून १ कोटि पौंड खर्चावे लागतील. सध्या सरकार विश्वविद्यालयांना २२½ लक्ष पौंड ग्रँट देतें, ती ६० ते ७० लक्ष पौंड करणें आवश्यक आहे, प्रत्येक विश्वविद्यालयाचें स्वातंत्र्य व वैशिष्ट्य कायम ठेवलें तरी कार्यांच्या सोईस्कर वाटणीसाठी एक सल्लागार मंडळ असावें; कारखान्यांत कामें करणाऱ्या होतकरू तरुणांची पार्टटाइम औद्योगिक शिक्षणाची सोय होणें जरूर आहे; प्रयोगशाळांत कामें करणारांचा पगार व दर्जा यांत वाढ करणें आवश्यक आहे; इत्यादि सूचनांवरून ग्रेट ब्रिटनच्या युद्धोत्तर औद्योगिक शिक्षणाच्या पूर्वतयारीची कल्पना येते.

---

### भौतिक शास्त्रांचें संशोधन

दिल्ली येथें भरलेल्या सायन्स काँग्रेसच्या व रॉयल सोसायटीच्या सभांच्या प्रसंगानें हिंदुस्थानांत भौतिक व यांत्रिक शास्त्रांच्या संशोधनास किती मोठें महत्त्व आहे ह्या विचारास चालना मिळाली आहे. हिंदी शास्त्रज्ञांच्या संशोधनास किती वाव आहे आणि ह्या देशाच्या आर्थिक प्रगतीस त्याचें किती अगत्य आहे ह्याची कल्पना व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल ह्यांनीहि प्रकट रीतीनें दिली आहे. अलीकडे नांव घेण्यासारखे भौतिक शास्त्रज्ञ हिंदुस्थानांत पुढें आले आहेत व त्यांच्या बहुमोल कामगिरीस मान्यता मिळाली आहे. युद्धप्रयत्नास त्यांच्या शोधांचें उत्कृष्ट सहाय झालें आहे ही गोष्ट आतां सुप्रसिद्ध आहे. युद्धोत्तर काळांत शास्त्रीय संशोधनास अधिक उत्तेजन मिळण्याची व्यवस्था होणें आवश्यक आहे ह्याची जाणीव सरकार व जनता ह्यांस झाली पाहिजे. ह्या बाबतींत हिंदुस्थान देश सध्या अतिशय मागसलेला आहे आणि पुढारलेल्या राष्ट्रांच्या मानानें येथें चाललेलें संशोधन कांहींच नाहीं असें म्हणावें लागतें. हिंदी उद्योगधंद्यांची वाढ ह्यापुढें जोरानें व्हावयाची असेल तर शेती व कारखाने ह्यांच्या प्रगतीसाठी राष्ट्रानें यांत्रिक व शास्त्रीय संशोधनाकडे अधिक लक्ष पुरवलें पाहिजे. इंग्लंड हा देश प्रस्तुत बाबतींत पुढारलेला आहे तरी तेथेंहि संशोधन कार्यावर अधिक खर्च सरकारनें करावा आणि विश्वविद्यालयें व स्वतंत्र शास्त्रीय संस्था यांस उत्तेजन व सहाय्य द्यावें अशी मागणी केली जात आहे. युद्धोत्तर काळांत चुरशीची आंतरराष्ट्रीय आर्थिक स्पर्धा पुन्हां चालू होईल तेव्हां ब्रिटिश उद्योगधंद्यांचा नव्या युगामध्यें टिकाव लागण्यास असें सरकारी धोरण आवश्यक असल्याचें सांगण्यांत येत आहे. अमेरिकेंत शास्त्रीय संशोधनावर जेवढा खर्च होतो त्याच्या एक दशांशहि ग्रेट ब्रिटनमध्यें केला जात नाहीं अशी तक्रार आहे. इंग्लंडमध्यें एका समितीच्या निवेदनांत अशी सूचना करण्यांत आली आहे कीं युद्धोत्तर काळाच्या पहिल्या पांच वर्षांत ब्रिटिश विश्वविद्यालयांस इमारती व सामुग्री इत्यादिसाठी भांडवली खर्च १३ कोटि रुपये आणि वार्षिक ग्रँट म्हणून ९ कोटि रुपये सरकारनें पुरवावे. हिंदुस्थाननें ह्या सूचनेपासून योग्य तो बोध घेणें आवश्यक आहे.

### शिक्षणप्रसाराची विशाल योजना

तेहेतीस वर्षामागें नामदार गोखले ह्यांनीं हिंदुस्थानांत सक्तीचें मोफत प्राथमिक शिक्षण चालू करण्याविषयींची सूचना वरिष्ठ कायदेमंडळापुढें मांडली असतां ती फेटाळण्यांत आली. त्यानंतर लोकनियुक्त मंत्र्यांच्या हातीं प्रांतिक सरकारांत सत्ता आली तेव्हां सक्तीच्या शिक्षणास प्रारंभ होऊन त्याची थोडीफार प्रगति झाली आहे. तसेंच, यांत्रिक व धंदेशिक्षण ह्यांची तरतूद केली जावी अशी मागणी सरकारकडे कित्येक वर्षे केली गेली असतां म्हणण्यासारखी फलनिष्पत्ती झाली नाहीं. युद्धसामुग्रीच्या कारखान्यांत कुशल कारागिर हवेत म्हणून हजारो हिंदी तरुणांस आज शिक्षण देण्यांत येत आहे आणि त्यांपैकीं कित्येकांस इंग्लंडमध्येंहि शिकवून तयार करण्यांत आलें आहे. ह्या कुशल लोकांचा उपयोग युद्धसमाप्तीनंतर हिंदी धंद्यांस होईल अशी अपेक्षा आहे. सर्वच बाबतींत हिंदुस्थान सरकारास बाहेरून तज्ज्ञ आणावे लागतात. शिक्षणासारख्या विषयावर सल्ला देण्यासाठी त्यानें मि. सार्जंट ह्या तज्ज्ञाची नेमणूक केली आहे. त्यांनीं युद्धोत्तर काळांत हिंदुस्थानांत होणें इष्ट असलेल्या शिक्षणप्रसाराची एक विस्तृत योजना तयार केली आहे. ती पुरी होण्यास चाळीस वर्षे लागतील आणि कोट्यवधि रुपये खर्चावे लागतील. ह्या योजनेंत मुलामुलींच्या प्राथमिक व मध्यम शिक्षणाची व्यवस्था सुचविण्यांत आली आहे आणि शेती, धंदे, व्यापार, वैद्यक वगैरे सर्व प्रकारांच्या शिक्षणास तींत योग्य स्थान देण्यांत आलें आहे. "सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः" ह्या न्यायानें अशा व्यापक शिक्षणयोजनेच्या पूर्तीसाठी पैसा कोठून आणावयाचा हा प्रश्न येथें उभा रहातोच. शिक्षणाच्या महत्त्वाची जाणीव आणि त्यासंबंधांतला उत्साह मि. सार्जंट ह्यांच्या अपेक्षेपेक्षा हिंदी जनतेंत अधिक आहे. शेतीची सुधारणा, उद्योगधंद्यांचा उत्कर्ष व प्राप्तीची वाढ ह्या मार्गांनीं शिक्षणास लागणारा पैसा उभा केला पाहिजे असें ते म्हणतात. ह्या बाबतींतहि सरकारचें योजनात्मक सहाय आवश्यक आहे. व्हायकौंट वेव्हल ह्यांच्या पुनर्घटनेच्या योजनेंत हिंदुस्थानांत रस्त्यांचें जाळें सर्वत्र पसरण्याच्या कल्पनेस अग्रस्थान देण्यांत आलें आहे आणि शिक्षण आरोग्यानंतर तिसरें आहे; आणि रस्त्यांच्या पूर्ण योजनेस साडेचारशें कोटि रुपये लागण्याचा अंदाज आहे. रेल्वेजच्या दुरुस्तीस व विस्तारास एवढीच आणखी रक्कम लागण्याचा संभव आहे. मग शिक्षण सुधारणेस वाव कोठें राहिला? शेती व उद्योगधंदे ह्यांविषयींच्या योजना अजून तयार व्हावयाच्याच आहेत. चलन, हुंडणावळ, व्यापार ह्यांच्या भवितव्याचा निकाल अजून लागावयाचा आहे. ह्या परिस्थितींत मि. सार्जंट ह्यांस स्वतःच्या शिक्षणयोजनेबाबत चिंता वाटल्यास त्यांत आश्चर्य नाहीं.

---

### प्रेसिडेंट रूझवेल्ट ह्यांची अमेरिकन सरकारास देणगी

प्रेसिडेंट रूझवेल्ट व मिसेस रूझवेल्ट ह्यांनीं हाइड पार्क (न्यू यॉर्क) येथील आपलें घर व ३५ एकर जमीन अमेरिकन सरकारला दिली आहे. ह्या जागेचा उपयोग "राष्ट्रीय ऐतिहासिक स्थान" ह्या दृष्टीनें करण्यांत यावा व प्रेसिडेंट रूझवेल्ट व त्यांचे अगदी निकटचे नातेवाईक ह्यांस त्यांच्या हयातींत घर वापरण्यास मिळावें, अशी त्या देणगीची अट आहे.

### पुण्यानजिकचें नमुनेदार खेडें

(लि. आ. मा.)

पुण्याच्या लकडी पुलापासून दीड मैलावर अनाथ बालिकाश्रम, हिंगणें या रस्त्यावर कोथरुड येथें ग्रामोद्धाराचें काम चालू असून सन १९४३ चे ऑक्टोबरमध्यें ग्रामोद्धार कार्याबद्दल सदर गांवास बक्षिस मिळालें आहे. या गांवीं प्रथम ग्रामोद्धार कार्यास सुरवात सन १९३७।३८ साली झाली. या कार्यांत गांवांतील पाटील मि. मोहीद्दीन इमामउद्दीन हे प्रामुख्यानें भाग घेतात. या कार्यास चालना देण्याचें सर्व श्रेय कर्मवीर आण्णासाहेब कर्वे व श्री. भा. धों. कर्वे यांना आहे. या गांवाहून हिंगणे या गांवास जाणारा रस्ता कॉलेजांतील मुलींनीं केला व नंतर रस्त्यास सरकारी ग्रँट मिळाली व रस्ता दुरुस्त झाला. पाणी पिण्याची उत्तम व्यवस्था केली. विहिरीस ज्या पायऱ्या होत्या त्या बंद करून या विहिरीस रहाट लावण्यांत आले. या कामीं जिल्हा डेव्हलपमेंट बोर्डाची ४६० रुपये मदत मिळाली. गांवांतील रस्त्यावर दगड वगैरे टाकून, ओल्यामुळें होणारी खराबी बंद करण्यांत आली व त्या कामीं गांवकरी व सरकार यांची आर्थिक मदत मिळविली. गांवांतील लोकांना वैद्यकीय मदत मिळावी अशी खटपट करण्यांत आली. शाळेची इमारत वाढविण्यांत आली व त्याचप्रमाणें वाचनालयाकरितां पुस्तकें आणविण्यांत आलीं. या कामीं सरकार व हिंगणे आश्रमाची बरीच मोठी मदत झाली. गांवाचे बाहेर स्वतंत्र खड्डे खताकरितां केले आहेत. अशा खड्ड्यांची संख्या २५ आहे. गांवात ग्रामपंचायत अगर सहकारी सोसायटी नाहीं. फक्त ग्रामसुधारणा मंडळ आहे. रस्त्याशिवाय इतर कामासाठीं सुमारें तीन हजार रुपये खर्च झाला आहे. गांवांतील अंतर्गत रस्ते सुधारण्यांत आले आहेत.

---

### औषध विक्रेत्यांवर बंधन

१५ जानेवारीनंतर सरकारी परवान्याशिवाय औषधांची आयात घाऊक अगर किरकोळ विक्री किंवा त्यांचें उत्पादन कोणासहि करतां येणार नाहीं. ठिकठिकाणच्या एक्साइज सुपरिंटेंडेंटना परवाना-अधिकारी नेमण्यांत आले आहेत.

ए. बी. सी. कॉइल्स
(डांसांच्या उदबत्त्या)
बॉक्समध्यें १२. बॉक्स किं. १० आणे.
रात्रभर जळतात.
लायसॉफ
केसांतील उवांवर आश्चर्यकारक शोध.
उवा १ तासांत मरतात
बाटली किं. १ रु. ★ दोन वेळां उपयोग.
दि मागोरा केमिकल कं. लि.
— टिळक रोड, पुणें २. —

## शेअर बाजार

(श्री. व. वि. लोणकर एम.ए., बी. कॉम., २४ डे. जि. पुणें ४)

नाताळ नंतर बाजार उघडतांच सर्व विभाग एकदम चढूं लागले आहेत. सोमवारी डिफर्ड २०२०,२५, डाईग २०९० पर्यंत होते. नाताळाच्या पूर्वी दहा दिवस सुट्टी येणार व न जाणो एखादे वेळेस पुन्हा जपानी विमानांची भेट यावयाची तेव्हां दूर असलेले बरें या भूमिकेमुळें बाजार सुस्त राहिले होतें. सुट्टींत कांहींच न घडलेंमुळें, तसेंच कांहीं गिरण्यांचे न भूतो न भविष्यति नफे जाहीर झाले त्यामुळें बाजाराला एकदम चेतना प्राप्त झाली. उदा. सोलापूर व न्यू व्हिक्टोरिया यांना ९० लाखांवर यंदा नफा झालेला आहे. इकडे बँक ऑफ इंडियाची होऊं घातलेली योजना एकदांची बाहेर पडली असून दोन जुन्या शेअरला एक शेअर नवा शंभराला असे मिळणार आहेत. सेंट्रल बँकेलाही एक कोटि सतरा लाखावर नफा मिळाला असून व्याजही जास्त म्हणजे वर्षाला तीन रु. करमाफ जाहिर झालें आहे. तसेंच ३॥ टक्का कागदही यंदा बरेच वर्षानंतर नाण्याच्या वैपुल्यामुळें ९९।२ पर्यंत चढला त्याला अनुसरून केवळ दीड रुपया व्याज देणारा १५ चा शेअर न्यू इंडिया रोख बोनस मिळणार या बाजार गप्पावर ९४ पर्यंत चढला.

या सर्व तेजीकारक घडामोडींत सरकारनें मुद्रित केलेले प्रांतोप्रांतचे लक्षावधि वार कापड व त्यामागे सरकारचा देशांतील एकूणएक जरूरीच्या वस्तूंचा कडक नियंत्रण करण्याचा निश्चय व सोडतीच्या स्वरूपांत नवें कर्ज उभारून कोठल्याही मार्गानें प्रजेची क्रय-शक्ति खची करण्याचा निश्चय या सर्वांचा तेजीवाल्यास विस्मर कसा पडतो याचा अचंबा आहे. या तिमाहींत जाहिर होणारी गिरण्यांची व्याजें १९४३ च्या उत्पादनावरील असून मागील भरमसाट भावामुळें ती जास्त येतील याबद्दल वाद नाहीं पण १९४४ च्या पहिल्या सहामाहीचीं व्याजें, सरकार कापडाचे भाव दर तिमाहींनें निसंशय खाली आणत असता व दडवून ठेवलेला माल–कापडच काय इतर सर्व–बाहेर काढीत असता चालू व्याजाइतकीं येणें अशक्यप्राय आहे. बाजारांतील कांहीं प्रमुख दलाल या दृष्टीनें व हिवाळ्यानंतर थोडक्याच अंतर्धींत जर्मनीचा खात्रीनें पाडाव होणार हे जमेस धरून गुंतविणारांना चढत्या भावांत मोकळे होण्याबद्दल एकसारखा आदेश देत आहेत. सध्याच्या उफाळींत ते अरण्यरुदनवत ठरत आहे. या आदेशाप्रमाणें मोकळे पैसे केलेल्याकरतां स्टील कॉर्पोरेशन ऑफ बेंगाल ५ टक्के करमाफ प्रेफरन्स १३१ पर्यंत मिळतो त्याकडे लक्ष पुरवावयास हवें अशी सूचना वावीशी वाटते.

---

### पंजाबमध्यें यमुना–गंगेवर धरणें

पंजाबमध्यें यमुना नदीवर 'बरवारा' धरणें बांधण्याची योजना आखण्यांत आली आहे परंतु धरणाच्या जागेचें परीक्षण मि. सॅव्हेज हे अमेरिकन भूगर्भतज्ज्ञ पुनः करणार आहेत. हरद्वारचे उत्तरेस ५० मैलांवर गंगा नदीवरहि धरण बांधण्याच्या युक्तायुक्ततेचें परीक्षण मि. सॅव्हेज ह्यांचेकडून पंजाब सरकार करून घेणार आहे.

### नव्या दिल्लीचे रचनाकार

नव्या दिल्लीची रचना आखणारे आर्किटेक्ट, सर एडवर्ड लुटिन्स हे नुकतेच मरण पावले.

### बंगालमधील तांदळाचें पीक

बंगालचें तांदळाचें हिवाळी पीक चांगलें असून उत्पादन ८३ लक्ष टनांचे घरांत जाईल असा अंदाज आहे. ह्यापूर्वीच्या पिकाचे उत्पन्नापेक्षा हें उत्पादन ६६% अधिक आहे,


सभा कशा चालवाव्या ?

परिषदा कशा पार पाडाव्या ?

ते भरसभेंत कौरव–पांडवांतील लठ्ठालठ्ठी थांबविणाऱ्या

महात्मा विदुरांना विचारा !

आर्यन, पुणें : : मराठी बोलपट

महात्मा विदुर

दिग्दर्शकः—आळतेकर

इतर भूमिकाः—मनोहर घटवाई, नायमपल्ली, प्रल्हाद

दररोज ३ खेळ—दुपारीं ३।, ६॥ व १० वा. दर रविवारीं सकाळीं १० वा.

न्यू अपोलो, पुणें : : हिंदी बोलपट

रॉयल रत्न १८

महात्मा विदुर

कला : बाबुराव पेंटर, भूमिकाः—विष्णुपंत पागनीस, दुर्गा खोटे

इतर भूमिकाः—यशोधरा काटजू, सीता अव्हेरी

दररोज दोन खेळः—दुपारीं ३ व रात्रौ ११ वाजतां

रिझर्व्हेशन सकाळीं १० ते १२ दुपारीं ३ चे पुढें. तिकिटांचे दर (सरकारी करासह):—बॉक्स रु. १–१२–०, फर्स्ट क्लास १–०–०, फॅमिली (आर्यन) सर्कल आ. १०, सेकंड क्लास आ. ९, इंटर क्लास आ. ५, थर्ड क्लास आ. ४, कुलीन स्त्रियांस आ. १० व आ. ५

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.
जीवनद्रव्यांनीं ( Vitamins ) युक्त असे
**टोमॅटो केचप (गोड) व**
**टोमॅटो सॉस [तिखट व आंबट]**
आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी
उणीव भरून काढा.
**रूरल प्रॉडक्ट्स कंपनी लि. पुणें**
बिझिनेस ऑफिसः ९११ अ सदाशिव, पुणें २.

**॥ दत्त कंपनी ॥**
७१५ शुक्रवार पेठ, पुणें २. दाणेआळी पोलिसगेटाजवळ
सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर
रिपेअर करून मिळतील.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

**विमेदार नि हवाई हल्ला**
शत्रुराष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव घालून बिन-लढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ? असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.

**ट्रस्ट ऑफ इंडिया**
**विमा कंपनीच्या**
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.

तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा
**ट्रस्ट ऑफ इंडिया**
विमा कंपनींतच उतरा.
अध्यक्षः—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं.
ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि., लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

**पुना गेस्ट हाऊस**
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.
Telephone 779
**GUEST HOUSE**
TELEGRAM Guest House Poona 2.

**न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.**
( Approved Re-traders and Approved Contractors )
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.
अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.
**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**
★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स
व इतर रबरी माल तयार होतो.
पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२०।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.